सत्यमेव जयते

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८, २२१०२२२२ Fax : २२६७३९१५

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**

**जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग ((a) शल्य चिकित्सक, (b) रुग्णालय अधीक्षक, (c) उप अधीक्षक-टिचिंग हॉस्पिटल, (d) वैद्यकीय अधिकारी - महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,वर्ग-१, इनचार्ज कॉटेज हॉस्पिटल, (e) वैद्यकीय अधिकारी - महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,वर्ग-१, इनचार्ज रूरल हॉस्पिटल), महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ**

**धारिका क्रमांक : १९४(१)(१)(४)/३७७४/पंधरा-अ, जाहिरात क्रमांक : १५६/२०११**

**आयोगामार्फत जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग ((a) शल्य चिकित्सक, (b) रुग्णालय अधीक्षक, (c) उप अधीक्षक-टिचिंग हॉस्पिटल, (d) वैद्यकीय अधिकारी-महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,वर्ग-१, इनचार्ज कॉटेज हॉस्पिटल, (e) वैद्यकीय अधिकारी - महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,वर्ग-१, इनचार्ज रूरल हॉस्पिटल) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ** पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th colspan="2">एकूण पदसंख्या</th><th>अराखीव</th><th>अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित</th><th>अनुसूचित जमाती</th><th>वि.जा. (अ)</th><th>भ.ज.(ब)</th><th>वि.मा.प्र.</th><th>भ.ज.(क)</th><th>भ.ज.(ड)</th><th>इ.मा.व.</th></tr>
<tr><td rowspan="4">१</td><td rowspan="4">एकूण पदे - ५७</td><td></td><td>२०</td><td>५</td><td>२</td><td>१</td><td>२</td><td>--</td><td>१</td><td>१</td><td>५</td></tr>
<tr><td>महिला -</td><td>१०</td><td>३</td><td>--</td><td>--</td><td>१</td><td>--</td><td>१</td><td>--</td><td>२</td></tr>
<tr><td>खेळाडू -</td><td>२</td><td>१</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td><td>--</td></tr>
<tr><td>अपंग -</td><td colspan="9">विज्ञापित एकूण ५७ पदांपैकी २ पदे - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु (एका पायाने अधू) साठी आरक्षित. अपंग उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील दोन पदे रिक्त ठेवण्यात येतील.</td></tr>
</table>

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. **२.२** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अपंग २००४/५५/समन्वय २, दि. २७ फेब्रुवारी, २००९ अनुसार प्रस्तुत पदासाठी फक्त **एका पायाने अधू उमेदवार पात्र आहेत**. **२.३** शासन आदेशानुसार वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीसाठी राखीव असलेले पद आंतर परिवर्तनीय असून सदर वर्गवारीतील पात्र उमेदवार न आढळल्यास सदर पद वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) वर्गवारीतील उमदेवारांमधून भरण्यात येतील.

**३. वेतनश्रेणी**:- रु.१५,६०० -रु.३९,१०० + ग्रेड पे रु.६,६००/-, एकूण वित्तलब्धी अंदाजित रु.४०,१८२/-

**४. पात्रता**:- ४.१ भारतीय नागरिक. **४.२ वय**:-(१) **दिनांक १ फेब्रुवारी, २०१२** रोजी ३५ वर्षे, मागासवर्गीयांसाठी ४० वर्षे. (२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील. (४) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अपवादात्मक अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. **४.३ शैक्षणिक अर्हता**:- **१**) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट, १९५६ मधील पहिल्या किंवा दुस-या शेडयुलमधील तत्सम अर्हता **आणि २**) कोणत्याही चिकित्सालयीन (क्लिनिकल) विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा फेलोशिप ऑफ कॉलेज ऑफ फिजिशियन ॲण्ड सर्जन्स, मुंबई इन मेडिसिन ऑर सर्जरी किंवा तत्सम अर्हता **आणि ४.४ अनुभव**: एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केल्यानंतर रुग्णालयातील किमान ५ वर्षांचा अनुभव पैकी तीन वर्षांचा किमान ३० खाटांची क्षमता असलेल्या कोणत्याही रुग्णालयातील कामाचा अनुभव. **४.५** परंतु पुढे असे नमूद करण्यात येते की, निवडीच्या कोणत्याही स्तरावर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) व इतर मागासवर्ग या वर्गवारीतील विहित अनुभवधारक पात्र उमेदवारांची संख्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास, अशा वर्गवारीतील आरक्षित पदे भरण्याच्या दृष्टीने, संबंधित वर्गवारीतील उमेदवारांचा अनुभव कालावधी आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल. **४.६** निवड झालेल्या उमेदववारांना खाजगी व्यवसाय करण्यास प्रतिरोधित करण्यात येईल; तथापि त्याऐवजी त्यांना नियमानुसार अनुज्ञेय असलेला पूरक भत्ता देण्यात येईल. **४.७** शिफारसपात्र ठरलेल्या उमदेवारांनी सेवा शर्तीनुसार किमान ५ वर्ष शासन सेवा करण्याबाबतचे बंधपत्र देणे बंधनकारक आहे किंवा त्याऐवजी दंड म्हणून रु.५००/- अथवा शासन निर्धारित करेल इतकी रक्कम शासनास अदा करणे आवश्यक आहे. **४.८** इंडियन मेडिकल कॉन्सिल ॲक्ट, १९५६ च्या अंतर्गत इंडियन मेडिकल रजिस्टर मध्ये नोदणीकृत नसतील तर शिफारशीपूर्वी त्यांनी स्वतःचे नाव महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल ॲक्ट, १९६५ च्या अंतर्गत नांदणीकृत असणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अर्हता व अनुभव किमान असून, किमान अर्हता व अनुभव धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे **निकष निश्चित करुन** अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

६. **कर्तव्ये व जबाबदा-या** :- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

८. **शुल्क** : (१) अमागास - रु.४१०/- (२) मागासवर्गीय - रु.२१०/- (३) सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. (४) बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑन लाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

९. **अर्ज करण्याची पद्धत**- (१)प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. (२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १७ ऑक्टोबर, २०११ ते दिनांक १४ नोव्हेंबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. (३)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल. (४)विहित पध्दतीने दोन्ही टप्यातील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे. (५)ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवारांजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ सें.मी. x उंची ४.५ सें.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (६) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच भरतीसंदर्भातील पुढील प्रक्रिया होऊ शकेल.

१०. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १४ नोव्हेंबर, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाव्दारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ पर्यन्त बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे** आवश्यक राहील.

११. चलनाव्दारे शुल्क बँकेमध्ये भरल्यानंतर बंकेकडून प्राप्त होणारा **Transaction ID दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१२. आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**१३. महत्वाची सूचना - उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**मुंबई :**
**दिनांक : १७ ऑक्टोबर, २०११.**

**तु. अ. पवार**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग